॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : द वीक हंसा संशोधन सर्व्हेक्षण २०२५ मध्ये देश पातळीवरील शासकीय बहुविद्याशाखीय विद्यापीठांच्या झालेल्या सर्व्हेक्षणात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने गेल्या वर्षभरात केलेल्या उत्तम कामगिरीच्या अधारे ३१वे स्थान प्राप्त करून मागील वर्षाच्या ५०व्या स्थानावरून भरारी घेतली आहे.

द वीक हंसा दरवर्षी संशोधन सर्व्हेक्षण करीत असते. त्यांनी केलेल्या सर्व्हेक्षणात देशपातळीवर ३१वे स्थानावर विद्यापीठ असून या यादीत महाराष्ट्रातील विद्यापीठांमधून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ३ऱ्या स्थानावर आहे. तसेच राज्य बहुविद्याशाखीय विद्यापीठांमधून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने २४ वे स्थान आणि पश्चिमविभागीय विद्यापीठांत ९ वे स्थान प्राप्त करून नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे.

हंसा रिसर्च ही ग्राहक केंद्री बाजाराचे सर्व्हेक्षण करणारी संस्था असून त्यांनी देशभरातील विद्यापीठांच्या कार्याचे त्रयस्थ पध्दतीने सर्वेक्षण करुन हा अहवाल तयार केलेला आहे. या सर्व्हेक्षणात विद्यापीठाचे वय, प्राप्त नॅक श्रेणी, भौतिक सुविधा, शिक्षण, शिक्षक, संशोधन यांच्यातील गुणवत्ता, विद्यार्थी संख्या, विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहन तसेच समाज माध्यमात विद्यापीठाची असलेली प्रतिमा इ. बाबी विचारात घेतल्या गेल्या. त्याअनुषंगाने विद्यापीठाने गेल्या वर्षभरात केलेले संशोधन, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम, नवनवीन प्रयोग, विद्यार्थी केंद्रीत उपक्रम, परीक्षांचे सुनियोजन, ४५दिवसांच्या कालावधीत जाहीर केलेले परीक्षा निकाल, विद्यार्थ्यांसाठी केलेल्या सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन प्रकल्पांसबंधीचे प्रोत्साहनपूर्ण कामकाज इ. संदर्भात कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या नेतृत्वाखाली प्र-कुलगुरु व व्यवस्थापन परिषद सदस्य,विद्यापरिषद, अधिसभा सदस्य व इतर प्राधिकरणे, प्रशाळा संचालक, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने विद्यापीठाने आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला आहे. त्याची ही नोंद देशपातळीवर घेण्यात आली आहे. हंसा रिसर्च यांचा अहवाल www.theweek.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अशी माहिति कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

..................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ११ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता